# मंत्रिमंडळ निर्णय

## दिनांक : २९ मे २०१८

## ( बैठक क्र. १७८ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १. | भूमीहिनांना मोठ्या प्रमाणात जमिनी मिळणार<br>**जमीन मालकाला रेडी रेकनरच्या दुपटीपर्यंत मोबदला देता येणार** | सामाजिक न्याय |
| २. | **राज्यातील स्वस्त धान्य दुकानांत आता ३५ रुपये किलो दराने तूरडाळ** | पणन |
| ३. | **नगरपरिषदा, नगरपंचायत क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची शास्ती शासन ठरवणार** | नगर विकास |
| ४. | **साताऱ्याच्या वैद्यकीय महाविद्यालयासाठी कृष्णा खोरे महामंडळाची जागा मिळणार** | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये |
| ५. | **पालिकांमधील अन्न निरीक्षकांना अन्न व औषध प्रशासनामध्ये सामावणार** | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये |
| ६. | **विद्युत निरीक्षणालयात आता मुख्य विद्युत निरीक्षकाचे पद** | ऊर्जा |
| ७. | **राज्यातील तीन सैनिकी शाळांतील ३६  शिक्षक पदांना अनुदान** | नगर विकास |
| ८. | **आपद्ग्रस्तांना तातडीने मदत देण्यासाठी कायमस्वरुपी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन** | महसूल |
| ९. | **महाराष्ट्र समृद्धी महामार्गासाठी सवलत करारनाम्यास मंजुरी** | सार्वजनिक बांधकाम |

भूमीहिनांना मोठ्या प्रमाणात जमिनी मिळणार

## जमीन मालकाला रेडी रेकनरच्या दुपटीपर्यंत मोबदला देता येणार

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील भूमीहिन लाभार्थ्यांना मोठ्या प्रमाणात जमीन उपलब्ध करून देण्यासाठी जमीन मालकाला रेडी रेकनर दराच्या दुपटीपर्यंत मोबदला देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचे राहणीमान उंचावण्यासह त्यांना कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना राबविण्यात येते. याअंतर्गत संबंधित समाजातील दारिद्र्यरेषेखालील आणि भूमीहिन शेतमजूर कुटुंबांना चार एकर जिरायती (कोरडवाहू) किंवा दोन एकर बागायती (ओलिताखालील) जमीन उपलब्ध करून देण्यात येते. जमीन खरेदीसाठी येणाऱ्या खर्चापैकी ५० टक्के रक्कम बिनव्याजी कर्ज व ५० टक्के रक्कम अनुदान म्हणून देण्यात येते. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वर्ष २०१२ मध्ये केलेल्या बदलांनुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समिती प्रथमत: प्रचलित रेडी रेकनरच्या किंमतीप्रमाणे जमीन विकत घेण्याचा प्रयत्न करेल. रेडी रेकनरच्या किंमतीप्रमाणे जमीन उपलब्ध होत नसल्यास जमिनीच्या मुल्याबाबत संबंधित जमीन मालकाशी वाटाघाटी करण्यात येतील. त्यानुसार रेडी रेकनरची किंमत अधिक २० टक्क्यांपर्यंत प्रथम वाढ देण्यात येईल. तरीसुद्धा जमीन विकत मिळत नसल्यास २० टक्क्यांच्या पटीत १०० टक्क्यांपर्यंत म्हणजेच रेडी रेकरनर दराच्या दुपटीपर्यंत मोबदला देण्यात येईल. हा मोबदला प्रति एकर तीन लाख इतक्या कमाल मर्यादेपर्यंत निश्चित करण्यात येत होता. मात्र, गेल्या काही वर्षात जमिनीच्या दरांमध्ये झालेली वाढ लक्षात घेता या योजनेचा लाभ अधिकाधिक कुटुंबांना मिळण्यासाठी जमीन खरेदी किंमत आणि शासन निधीच्या निकषामध्ये सुधारणा करण्यासह जमीन खरेदी प्रक्रिया सुलभ करण्याचा निर्णय आज घेण्यात आला.

आजच्या निर्णयानुसार जिरायती जमिनीसाठी ही रक्कम प्रति एकर कमाल पाच लाख आणि बागायती जमिनीसाठी प्रति एकर कमाल आठ लाख करण्यात आली आहे. या योजनेत लाभार्थ्यांना १०० टक्के रक्कम शासन अनुदान म्हणून देण्यात येईल. या योजनेच्या अनुदानासाठी २०१८-१९ या वर्षात ४० कोटींची तरतूद करण्यात आली असून भविष्यात मागणीप्रमाणे निधी वाढविण्यात येणार आहे.

-----o-----

*पणन विभाग*

## राज्यातील स्वस्त धान्य दुकानांत आता ३५ रुपये किलो दराने तूरडाळ

राज्यातील ग्राहकांच्या हितासाठी स्वस्त धान्य दुकानातून सध्या विक्री करण्यात येत असलेल्या तूरडाळीच्या प्रति किलो ५५ रुपयांच्या दरात सुधारणा करण्यात आली असून आता प्रति किलो ३५ रुपयांप्रमाणे विक्री करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

कर्नाटक व तामिळनाडू या राज्यांमध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत तूरडाळीचा पुरवठा अनुक्रमे ३८ रुपये आणि ३० रुपये प्रति किलो याप्रमाणे केला जातो. या राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत कमीत कमी किंमतीत तूरडाळीची विक्री करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे शासनाचे सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, पूर्णतः अथवा अंशतः अनुदानित संस्था याद्वारे होणारी तूरडाळीची खरेदी पुढील आदेश होईपर्यंत फक्त महाराष्ट्र राज्य पणन महासंघाकडून शासकीय दराने करण्यास बंधनकारक करण्यात आली आहे.

-----o-----

## नगरपरिषदा, नगरपंचायत क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची शास्ती शासन ठरवणार

राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायती यांच्या क्षेत्रात अनधिकृत बांधकामांवर शास्ती आकारताना त्यामध्ये एकवाक्यता असावी आणि त्यासोबतच अनधिकृत निवासी बांधकामांना आळा बसावा यासाठी शास्ती आकारणीचे दर आता शासन ठरवणार आहे. त्यासाठी संबंधित अधिनियमात सुधारणा करुन ती पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

सन २००८ चा अधिनियम क्रमांक २ नुसार घेण्यात आलेल्या निर्णयानुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम-१८८८ मध्ये कलम १५२ ए; महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये कलम २६७ ए आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये कलम १८९ ए या कलमांचा समावेश करण्यात आला होता. या कलमांनुसार, बेकायदेशीर बांधकामांवर दंडात्मक आकारणी करण्याबाबत या तीनही अधिनियमांमध्ये तरतूद करण्यात आली होती. या तरतुदीनुसार, संबंधित बेकायदा बांधकामांवर लागू असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटीइतकी शास्ती निश्चिती करण्यात आली होती.

मात्र, अनधिकृत इमारतींमध्ये राहणाऱ्या, मात्र अशा बांधकामात सहभाग नसणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना मालमत्ता कर हा दंडात्मक शास्तीसह भरावा लागतो, ही बाब लक्षात घेऊन मुंबई महानगरपालिका अधिनियम १५२ ए तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६७ ए या दोन्हींमध्ये यापूर्वी सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ अन्वये सुधारणा करण्यात आली. या सुधारणेनुसार, अनधिकृत इमारतींवर शास्तीचा दर हा संबंधित महानगरपालिकेकडून ठरविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, शास्तीकराच्या दरात सर्व महानगरपालिकांमध्ये एकवाक्यता राहण्याच्या दृष्टीने शासनाने महानगरपालिकांना निर्देशही दिले.

याच धर्तीवर, नगरपरिषद अधिनियमांमध्येदेखील बदल करण्याची मागणी होत होती. ही मागणी विचारात घेऊन महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम-१९६५ मध्ये शास्ती कर दरबाबतच्या तरतुदीमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय आज घेण्यात आला आहे. पूर्वीच्या तरतुदीनुसार, अशा इमारतींवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटीइतकी शास्ती भरण्याची तरतूद होती. आज मंजूर करण्यात आलेल्या सुधारणेनुसार अशा अनधिकृत इमारतींवर शासनाकडून वेळोवेळी ठरविण्यात येणाऱ्या दराने शास्ती भरावी लागणार आहे.

ही शास्ती भरताना ६०० चौरस फुटापर्यंतच्या निवासी बांधकामांवर कोणतीही शास्ती आकारण्यात येणार नाही. तर ६०१ ते १००० चौरस फुटापर्यंतच्या निवासी बांधकामांना प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या ५० टक्के दराने शास्ती आकारण्यात येईल. १००१ चौरस फुटापुढील निवासी बांधकामांवर सध्याच्या दराने म्हणजे, प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात येईल.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम-१९६५ च्या कलम १८९ ए मधील ही सुधारणा तसेच यापूर्वी मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मध्ये कलम १५२ ए आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये कलम २६७ ए यातील सुधारणा पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

-----०-----

*वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग*

## सातार्‍याच्या वैद्यकीय महाविद्यालयासाठी कृष्णा खोरे महामंडळाची जागा मिळणार

सातारा येथील प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाची जागा कायमस्वरुपी हस्तांतरित करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

शासनाकडून सातारा येथे १०० विद्यार्थी क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ५०० खाटांचे संलग्नित रुग्णालय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निकषानुसार वैद्यकीय महाविद्यालय स्थापनेस सलग २५ एकर जागा आवश्यक असते. गरजू रुग्ण व वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी महाविद्यालयाचा परिसर सातारा शहरालगत असणे आवश्यक आहे. त्यामुळे कृष्णा खोरे विकास महामंडळाची जागा विनाअट व विनामूल्य हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली.

-----o-----

*वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग*

## पालिकांमधील अन्न निरीक्षकांना अन्न व औषध प्रशासनामध्ये सामावणार

अन्न भेसळ व सुरक्षेसाठी अस्तित्वात असलेल्या अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम-२००६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नागरी स्वराज्य संस्थेकडे कार्यरत असलेल्या अन्न निरीक्षकांना अन्न व औषध प्रशासनामध्ये (एफडीए) अन्नसुरक्षा अधिकारी (गट-ब) या संवर्गामध्ये सामावून घेण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीदरम्यान घेण्यात आला.

अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम-२००६ हा कायदा ऑगस्ट-२०११ पासून देशभरात लागू करण्यात आला. अन्न सुरक्षा व मानदे अधिनियमाची एकछत्री अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने आयुक्त, अन्न व औषध प्रशासन तथा अन्न सुरक्षा आयुक्त यांनी दिनांक १ ऑगस्ट २०११ रोजी अधिसूचना काढून अन्न व औषध प्रशासनाच्या आस्थापनेवरील तसेच नागरी स्वराज्य संस्थांच्या आस्थापनेवरील सर्व अन्न निरीक्षकांना अन्न सुरक्षा अधिकारी म्हणून विशिष्ट कार्यक्षेत्रांसाठी यापूर्वीच ५ ऑगस्ट २०११ पासून नियुक्त केलेले आहे. नागरी स्वराज्य संस्थांमधील हे अन्न निरीक्षक अन्न व औषध प्रशासनाच्या नियंत्रणाखाली असले तरीही त्यांचे वेतन तसेच सेवा विषयक बाबी नागरी स्वराज्य संस्थांकडून हाताळण्यात येतात. त्यामुळे या अधिकाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासन आणि नागरी स्वराज्य संस्था या दोन भिन्न यंत्रणाचे दुहेरी नियंत्रण आहे. या बाबींचा विचार करुन राज्यातील विविध नागरी स्वराज्य संस्थांकडे कार्यरत अन्न निरीक्षकांना अटी व शर्तींच्या अधीन राहून अन्न व औषध प्रशासनातील अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब (राजपत्रित) या पदावर कायमस्वरुपी सामावून घेण्यास याद्वारे मान्यता देण्यात आली आहे. तसेच, या अधिकाऱ्यांना अन्न व औषध प्रशासनातील अन्न सुरक्षा अधिकारी या पदावर सामावून घेण्यासाठी नामनिर्देशनाच्या कोट्यातील आरक्षणाच्या प्रवर्गनिहाय ३३ पदे रिक्त ठेवण्यात आली आहेत.

या अधिकाऱ्यांना अन्न व औषध प्रशासनात सामावून घेतल्यानंतर त्यांची नागरी स्वराज्य संस्थांमधील नियमित सेवा शासकीय सेवेत जोडून देण्यात येणार असून त्यांच्या समावेशनानंतर त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शासनाचे सर्व सेवानियम, आदेश, परिपत्रके इत्यादी लागू राहतील.

-----o-----

*ऊर्जा विभाग*

## विद्युत निरीक्षणालयात आता
## मुख्य विद्युत निरीक्षकाचे पद

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून विद्युत निरीक्षणालय ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली आणल्यानंतर याचे नियंत्रण करण्यासाठी मुख्य विद्युत निरीक्षक पद मंजूर करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूरी देण्यात आली.

विद्युत निरीक्षणालय सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असताना त्याचे सर्व प्रशासकीय कामकाज मुख्य अभियंता (विद्युत) यांच्याकडून हाताळण्यात येत होते. मात्र विद्युत अधिनियम २००३ व त्या अनुषंगाने बनविण्यात आलेले नियम व विनियम सक्षमपणे राबविण्यासाठी २०१५ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून विद्युत निरीक्षणालय ऊर्जा विभागाच्या अस्थापनेखाली आणल्यानंतर या निरीक्षणालयासाठी मुख्य विद्युत निरीक्षक पद निर्माण करणे आवश्यक बनले होते.

मुख्य विद्युत निरीक्षक यांच्या अधिपत्याखाली विद्युत निरीक्षणालय शाखेतील अधिक्षक अभियंता, विद्युत निरीक्षक, सहाय्यक विद्युत निरीक्षक, सहाय्यक अभियंता श्रेणी-२, शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता ही तांत्रिक व उपसंचालक (लेखा), विद्युत निरीक्षक व इतर अतांत्रिक अशी एकूण १०४६ पदे कार्यरत आहे. या अस्थापनेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच महसूल वसुलीचे काम आणखी प्रभावी करण्यासाठी मुख्य विद्युत निरीक्षक हे पद निर्माण करण्यात आले असून या पदासाठी ३७४००-६७००० ही वेतनश्रेणी असून १०००० हा ग्रेड पे आहे.

-----o-----

*नगर विकास विभाग*

## राज्यातील तीन सैनिकी शाळांतील
## ३६ शिक्षक पदांना अनुदान

राज्यातील तीन सैनिकी शाळांतील अतिरिक्त १८ तुकड्यांतील ३६ शिक्षक पदांना मंजुरी देण्यात आली असून त्यासाठी २० टक्के अनुदान मंजूर करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यात यशवंतराव चव्हाण सैनिकी शाळा (सुपखेला, ता. जि. वाशिम), राजीव गांधी मिलिटरी स्कूल (कोलवड, ता.जि. बुलढाणा) आणि ईश्वर देशमुख सैनिकी शाळा (सावंगा बुद्रुक, ता. जि.यवतमाळ) या सैनिकी शाळांचा समावेश असून त्यांना प्रत्येकी सहा तुकड्या आणि प्रति तुकडी दोन प्रमाणे ३६ शिक्षकपदे मंजूर करण्यात आली आहेत.

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये राज्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, तसेच शालेय स्तरावर सैनिकी नेतृत्व गुणांचा विकास व्हावा यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात सैनिकी शाळा सुरू करण्याचा शासनाचा धोरणात्मक निर्णय आहे. तसेच आता या कायम विनाअनुदान यांतील कायम हा शब्द वगळण्यात आला असून मुल्यांकनाच्या निकषात बसलेल्या या शाळांच्या पाचवी ते दहावी असे प्रत्येकी सहा तुकड्यांना मान्यता देण्यात आली आहे. या शाळांना प्रत्येक तुकडीस दोन या प्रमाणे ३६ शिक्षकांच्या पदासही मंजुरी देण्यात आली असून शासनाच्या नियमाप्रमाणे या शिक्षकांची नियुक्ती आणि पटसंख्या असणे बंधनकारक केले आहे. दरम्यान, राज्यातील शासन अनुदानित खासगी सैनिकी शाळांमध्ये सुधारणेसंदर्भात तपासणी करून शिफारसी करण्यासाठी अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

-----o-----

## आपद्ग्रस्तांना तातडीने मदत देण्यासाठी कायमस्वरुपी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन

नैसर्गिक आपत्तींच्या घटनांसह त्यामध्ये न मोडणाऱ्या आपत्तींच्या इतर घटनांमध्ये आपद्ग्रस्तांना मदत मंजूर करण्याचे निर्णय घेण्यासाठी मदत व पुनर्वसन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यास तसेच या उपसमितीस अधिकार प्रदान करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या नैसर्गिक आपत्तींमध्ये तसेच अवेळी पाऊस, अतिवृष्टी, समुद्राचे उधाण, आकस्मिक आग, वीज कोसळणे अशा घटनांमध्ये होणारे मृत्यू, जखमी व्यक्तींना मदत, घरांची पडझड, जनावरांचा मृत्यू या प्रकरणांमध्ये १३ मे २०१५ च्या शासन निर्णयानुसार निश्चित दरांनुसार जिल्हा स्तरावर तातडीने मदत करण्यात येईल.

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये निश्चित केलेल्या नैसर्गिक आपत्तींप्रसंगी होणारे शेतीपिकांचे नुकसान, जमीन खरडून जाणे, जमीन वाहून जाणे, मच्छिमारांचे नुकसान अशा प्रकरणी तातडीने मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्यासाठी मदत व पुनर्वसन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कायमस्वरुपी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

मानव निर्मित आपत्तींमध्ये विशेष सहाय्य तसेच अवेळी पाऊस, अतिवृष्टी, समुद्राचे उधाण यासारख्या स्थानिक नैसर्गिक आपत्तींच्या घटनांमध्ये होणारे शेतीपिकांचे नुकसान, जमीन खरडून जाणे, जमीन वाहून जाणे, मच्छिमारांचे नुकसान यासारख्या नैसर्गिक आपत्ती निकषांमध्ये नसणाऱ्या बाबींना विशेष सहाय्य करण्याचे अधिकार या मंत्रिमंडळ उपसमितीस राहणार आहेत. मदतीचे असे प्रस्ताव वित्त विभागाच्या अभिप्रायासह मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयासाठी ठेवण्यात येणार आहेत. तसेच पाणी टंचाईच्या कालावधीमध्ये उपसा सिंचन योजनांचा उपयोग पाण्याचा उद्भव निर्माण करण्यासाठी झाला असल्यास, केवळ टंचाई कालावधीतील, अशा योजनांची चालू विद्युत देयकांची रक्कम मदत व पुनर्वसन विभागाच्या तरतुदीमधून देण्याचे प्रस्ताव वित्त विभागाच्या अभिप्रायासह मंत्रिमंडळ उपसमितीसमोर निर्णयार्थ सादर करण्यात येतील.

-----०-----

## महाराष्ट्र समृद्धी महामार्गासाठी सवलत करारनाम्यास मंजुरी

नागपूर-मुंबई शीघ्रसंचार द्रुतगती मार्ग )महाराष्ट्र समृद्धी महामार्ग (या प्रकल्पासाठी राज्य शासन , महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि नागपूर-मुंबई सूपर कम्युनिकेशन एक्स्प्रेस वे लिमिटेड (एसपीव्ही) या संस्थांमध्ये करावयाच्या त्रिपक्षीय सवलत करारनाम्याच्या प्रारूपास तसेच हा करारनामा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने ३०नोव्हेंबर २०१५ रोजीच्या बैठकीमध्ये नागपूर-मुंबई द्रुतगती मार्गाची ग्रीनफिल्ड अलाईनमेंट करण्यास व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यास कार्यान्वयन यंत्रणा म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार ऑगस्ट-२०१६ मधील शासन निर्णयानुसार या प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांची कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नियुक्ती झाली आहे. या महामंडळाची दुय्यम कंपनी म्हणून ॅनागपूर-मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे लिमिटेडड या नावाने विशेष हेतू यंत्रणा )स्पेशल पर्पज व्हेईकल ( स्थापित करण्यासह कंपनी अधिनियमांतर्गत विहित नोंदणी करण्यास मान्यता देण्यात येऊन तिची स्थापनाही करण्यात आली आहे. या यंत्रणेच्या भागभांडवलापैकी किमान ५१टक्के भागभांडवल पूर्ण सवलत कालावधीसाठी रस्ते विकास महामंडळाकडे राहणार आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत ४६ हजार कोटी इतकी असून सध्या सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे .या प्रकल्पाच्या उभारणीसाठी वित्तीय संस्थांकडून निधी उभारणे प्रगतीपथावर आहे.

आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व दुय्यम कंपनी नागपूर-मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे लिमिटेडड यांच्यामध्ये करण्यात येणाऱ्या करारनाम्याच्या प्रारुपास व त्यांच्यामध्ये त्रिपक्षीय करारनामा करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच निविदेनुसार येणारी प्रकल्पाची अंतिम किंमत व त्यानुसारचा सवलत कालावधी वित्त विभागाच्या मान्यतेने अंतिम करण्यास मान्यता देण्यात आली.

-----o-----